पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग

# एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर, तह. तुमसर, जि. भंडारा

## तुमसर परिसरातील लघु व कुटीर उद्योगाचे सर्वेक्षण

## अहवाल

अर्थशास्त्र विभागातर्फे एम. ए. भाग 1 सत्र 1 च्या विद्याथ्यामार्फत तुमसर परिसरातील लघु व कुटीर उद्योगाचे सर्वेक्षण घेण्यात आले. यामध्ये एकूण 28 विद्यार्थी सहभागी झाले. क्षेत्रीय पाहणीमध्ये विद्यार्थ्यांनी अनुसूचोच्या सहाय्याने माहिती मिळविली आहे. संबंधित अनुसूचोत प्रश्नांची रचना उद्योगाशी निगडीत असलेल्या विविध वैशिष्टयांचा व समस्यांचा समावेश होईल अशा प्रकारे करण्यात आले आहे.

उद्योगाची मालकी कोणत्या प्रकारची आहे. यावरून उद्योगाची दिशा निश्चित होते. वैयक्तिक मालकी अंतर्गत फक्त एका उद्योजकाद्वारा व्यवस्थापन होत असते. भागीदारी म्हणजे उद्योजकांचा समुह असतो. सहकारी गट म्हणजे उद्योजकांचा ऐच्छिक संघ असतो. या 28 उद्योजकांपैकी वैयक्तिक मालकिचे उद्योग 27 आहेत व सहकारी गटा अंतर्गत चालविण्यात येणारा उद्योग 01 आहे. कोणत्याही व्यवसायाची सुरवात ही निश्चितच उद्देशावर अवलंबून असते. उद्देश नसतांना कोणत्याही व्यवसायाची सुरवात करणे अशक्य आहे. उद्देशाला समोर ठेऊन उद्योजक उद्योगाचे संचालन करत असतो. उद्देश हे व्यक्तीनुसार भिन्न–भिन्न असतात. या 28 उद्योजकांपैकी आत्मनिर्भर होण्याकरीता व कुटूंबाकरीता आर्थिक सहकार्य करावे म्हणून उद्योग स्थापन केल्याचे जास्तीत जास्त उद्योजकांनी सांगितले आहे. तसेच उद्योग सुरू करण्यासाठी कुटूंबातील सदस्याकडूनच प्रेरणा मिळाल्याचे सांगितले आहे. उद्योजकतेचे स्वरूप हे दोन प्रकारचे असू शकते. यामध्ये ज्या कुटूंबात वंशपरंपरागत चालत आलेली व्यवसायाची पार्श्वभूमी आहे अस 09 उद्योजक आहेत आणि नातेवाईक मित्र–मैत्रीणी, शासकीय व अशासकीय संस्था इ. घटकांकडून प्रवृत्त होऊन कुटुंबामध्ये पहिल्यांदाच उद्योजक बनणारे असे 19 उद्योजक आहेत. सर्वेक्षणामध्ये कृषीवर आधारित उत्पादन करणा–या 05 उद्योगाचे, कापड उत्पादन करणा–या 08 उद्योगांचे, ब्युटी पार्लर चालविणा–या 06 उद्योगाचे, अन्न व अन्न प्रक्रिया, अभियांत्रिकी यांचे प्रत्येकी 03 उद्योगाचे तसेच पाणी शुद्धीकरण, दुध उत्पादन, किराणा उद्योगाचा समावेश आहे.

**उद्योगातोल भांडवल गुंतवणूक :**

एकूण उद्योजकांपैकी ब–याच उद्योजकांना भेडसावणारी प्रमुख समस्या म्हणजे भांडवलाची समस्या होय. म्हणूनच उत्पादन प्रक्रियेत पुरेशे भांडवल असणे आवश्यक असते. एकूण उद्योजकांपैकी 13 उद्योजकांनी त्यांच्या उद्योगातील भांडवल–गुंतवणूक मर्यादा 50,000 रू. पर्यंत ठेवली आहे. 50,000 ते 1,00,000 रू. पर्यंत भांडवल–गुंतवणूक असणा–या उद्योजक हे 07 आहेत. ज्यांची भांडवल गुंतवणूक 1,00,001 ते 10,00,000 रू. पर्यंत आहे असे 07 उद्योजक आहेत. तर 25,00,000 रू. पेक्षा जास्त भांडवल गुंतवणूक असणारा 01 उद्योजक आहे.

**उद्योगाची वार्षिक उलाढाल :**

उत्पादन संस्था तेजीत आहे. हे त्या व्यवसायाच्या उलाढालीवरून समजते. केलेल्या भांडवल गुंतवणूकीच्या तुलनेत व्यावसायिक उलाढाल अधिक पटीत असू शकते. 1,00,000 रू. पर्यंत वार्षिक उलाढाल असणारे उद्योजक 20 आहेत. 1,00,001 – 20,00,000 रू., 20,00,001 – 50,00,000 रू. व 50,00,001 – 1,00,00,000 रू. दरम्यान वार्षिक उलाढाल असणा–या उद्योजकांची संख्या अनुक्रमे 06, 06, 00 आहे. तसेच 1,00,00,000 पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असणा–या उद्योजकाचो संख्या 01 आहे.

**उद्योजकांचे मासिक उत्पन्न :**

उद्योगाच्या मासिक उत्पन्नातील वृद्धी हे उद्योगाच्या प्रगतीचे सूचक असते. एकूण 28 उद्योजकांपैकी 15 उद्योजकांनी उद्योगाच्या स्थापनेच्या वेळेस उत्पन्न मर्यादा 10,000 पर्यंत असल्याचे सांगितले. तसेच 10,001 ते 30,000 रू. व 30,001 ते 50,000 रू. उत्पन्न मर्यादा असणा–या उद्योजकांची संख्या अनुक्रमे 08 व 02 आहे. 50,000 रू. पेक्षा जास्त उत्पन्न मर्यादा असणा–या उद्योजक 03 आहेत.

**उद्योगाचा मासिक खर्च :**

उद्योगाच्या संचालनाकरीता आवश्यकतेनुसार कच्च्या मालाची खरेदी, कर्मचा–यांचे वेतन, उद्योगाचा दैनंदिन खर्च इ. सर्व प्रकारचा एकूण खर्च करावा लागतो. एकूण 28 उद्योजकांपैकी 20 उद्योजकांनी उद्योगाचा खर्च 10,000 पर्यंत येत असल्याचे सांगितले आहे. तसेच

10,001 ते 30,000 रू. व 30,001 ते 50,000 रू. खर्च येत असल्याचे सांगणा—या उद्योजकांची संख्या अनुक्रमे 03 व 01 आहे. तर 50,000 रू. पेक्षा जास्त खर्च येत असल्याचे सांगणारा उद्योजक 01 आहे.

**उद्योगाचा मासिक लाभ :**

सामान्यतः कोणताही उद्योजक उद्योगाची स्थापना लाभाच्या अपेक्षेन करीत असतो. उद्योगाचा लाभ उद्योजकाला प्रगती करण्याकरीता प्रेरित करीत असते. उद्योगाच्या मासिक लाभाबाबतीत एकूण उद्योजकांना विचारले असता 5,000 रू. पर्यंत मासिक लाभ मिळविणा—या उद्योजकांची संख्या 15 आहे. तसेच 5,001 ते 15,000 रू. व 15,001 ते 25,000 रू. मासिक लाभ मिळविणा—या उद्योजकांचो संख्या अनुक्रमे 05 व 03 इतकी आहे. याशिवाय 25,000 रू. पेक्षा जास्त मासिक लाभ मिळविणा—या उद्योजक 05 आहेत.

**उद्योगातील रोजगाराचे प्रमाण :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील बेकारी व दारिद्रय या समस्येवर उपाययोजना म्हणजे स्वयंरोजगार व उद्योजकता हे होय. एकूण उद्योगातील रोजगाराचे प्रमाण याविषयी विचारणा केली असता 24 उद्योजकांनी रोजगार पुरविला आहे.

**उद्योजकता विकास कार्यक्रमासंदर्भात माहिती :**

देशामध्ये सरकार उद्योजकता विकास घडवून आणण्याकरीता विविध कार्यक्रमांचा अवलंब करीत असते. याकरीता विविध संस्थांची स्थापना करून त्यांच्यामार्फत उद्योजक घडविणे व प्रशिक्षणाच्या सोयीसाठी व्यवस्था तयार करण्याचे कार्य वेळोवेळी होत असते. आज विविध संस्था कार्यरत असून जिल्हा उद्योग केंद्र ही संस्था जिल्हा स्तरावर उद्योजकता विकास कार्यक्रम राबवित आहे. यात एकूण उद्योजकांपैकी 10 उद्योजकांनी उद्योजकता विकास कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.

**उद्योजकांनी घेतलेले प्रशिक्षण :**

यशस्वी उद्योजकासाठी प्रशिक्षण हा महत्वाचा घटक आहे. यातून स्वयंरोजगारासाठी नेमके काय केले पाहिजे याबद्दल माहिती मिळते. एकूण उद्योजकांपैकी 17 उद्योजकांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**कर्ज व अनुदान :**

उद्योग क्षेत्राचा विकास व्हावा यादृष्टीने शासकीय व अशासकीय पातळीवर अनेक वित्तीय संस्था आणि बँका उद्योजकांना सवलतोच्या दराने कर्ज पूरवठा करतात. विशेषतः जिल्हा उद्योग केंद्राच्या शिफारशीनुसार विविध बँकांच्या माध्यमातून कर्ज पूरवठा होत असते. एकूण उद्योजकांपैकी 14 उद्योजकांनी कर्ज घेतले आहे. यामध्ये 50,000 रूपयापर्यंत कर्ज घेणा–या उद्योजकांची संख्या 06 एवढी आहे. 50,001 ते 1,00,000 व 1,00,001 ते 2,00,000 रूपये पर्यंत कर्ज घेणा–या उद्योजकांची संख्या अनुक्रमे 04 व 02 आहे. तर 5,00,000 रूपयांपेक्षा जास्त कर्ज घेणा–या उद्योजकांची संख्या फक्त 02 आहे. यामध्ये फक्त 02 उद्योजकांना अनुदान मिळाल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**उद्योजकांना येणा–या अडचणी :**

उद्योग स्थापन करणे एक कठीण कार्य आहे. यामध्ये उद्योजकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. उद्योजकांना येणा–या अडचणीमध्ये प्रामुख्याने उद्योगाची नोंदणी करतांना अधिक कालावधी लागणे, पायाभूत सुविधांची अडचण, कामाचे अतिरिक्त दडपण, कौटूंबिक प्रेरणेचा अभाव, सामाजिक वर्तणुकीची समस्या, खंडीत वीज पुरवठा, विपणन समस्या, भांडवलाची कमतरता, मालाच्या कमी किंमती इत्यादी समस्या सांगण्यात आल्या आहेत.

**उद्योगाच्या प्रगती संदर्भात दृष्टीकोण :**

आपल्या उद्योगाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी असे प्रत्येक उद्योजकाला वाटत असते. परंतू प्रत्येक उद्योजक यात यशस्वी होऊ शकत नाही. आज देशाच्या औद्योगिक विकासामध्ये उद्योजकांचे स्थान मोलाचे आहे. एकूण उद्योजकांपैकी 23 उद्योजकांनी उद्यागाची प्रगती आहे तर 05 उद्योजकांनी उद्योगाची प्रगती मंद गतोने आहे असे सांगितले आहे.

**उद्योजकांनी केलेल्या सूचना :**

1. उद्योगातील कामगारांकरीता प्रशिक्षण केंद्रांची संख्या वाढविण्यात यावी.
2. तालुका स्तरावर तांत्रिक तज्ञांच्या सेवा देण्याविषयी व्यवस्था करण्यात यावी.
3. समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून उद्योगातील समस्या सोडविण्यासंदर्भात प्रभावी व्यवस्था करण्यात यावी.
4. औद्योगिक परिसरात पायाभूत सुविधा प्रामुख्याने वाढविण्यात याव्या.

5. उद्योगातून उत्पादित केल्या जाणा—या वस्त्च्या विक्रीसाठी बाजारपेठांच्या विस्ताराची जबाबदारी व मार्गदर्शनाची प्रभावी व्यवस्था शासकिय व्यवस्थेने करावी.
6. उद्योजकांना बँकेमार्फत प्राप्त होणा—या कर्जाच्या सवलतीमध्ये वाढ व्हावी व अटी शिथिल करण्यात याव्यात.
7. उद्योजकांचा दृष्टीकोण सक्षम करण्यासाठी तालुका स्तरावर चर्चासत्र, शिबिरे, परिसंवाद, मेळावे आयोजित करावे.
8. सरकारच्या योजनांबाबतच्या शासकिय परिपत्रकाची प्रत जिल्हयातील प्रत्येक उद्योजकांना प्राप्त होईल अशो जिल्हा उद्योग केंद्रामार्फत व्यवस्था करण्यात यावी. जेणेकरून योजनांची अद्ययावत माहितो उद्योजकांना प्राप्त होईल.
9. उद्योजकांकरीता कर्जाची सोमा वाढविण्यात यावी.
10. शासनाने उद्योग विस्ताराकरीता जिल्हा स्तरावर वित्तीय साधनांची वाढ करावी.

**डॉ. जयंतकुमार एम. मस्के**
**अर्थशास्त्र विभागप्रमुख**

<u>उद्योगाचे सर्वेक्षण करतांना विद्यार्थी</u>


बिडी उद्योग


आटा चक्की


किराणा व्यवसाय


ब्युटी पार्लर


दूध उद्योग


राईस मिल


रेशम वस्त्र उद्योग


कापड उद्योग


पोहा उद्योग


गुळ निर्माण उद्योग


पाणी शुद्धीकरण


शिलाई मशीन


शेळीपालन


सिमेंट उद्योग